## दोषारोप निश्चिती पूर्वीचा फिर्यादी यांचा शपथेवर जबाब

मी शपथेवर कथन करतो की,

नाव – प्रविण बब्रूवाहन ओहोळ,

वय – ५२ वर्षे, हुद्दा – जिल्हा मृदा सर्वेक्षण व मृदा चाचणी अधिकारी,

नेमणूक – राज्य कृषी विभाग, ओरोस.

सरतपास अभियोग पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता श्री. एच. टी. चव्हाण.

**०१.** ऑगस्ट २०१२ ते मे २०१५ या कालावधीत जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरिक्षक म्हणून कार्यरत होतो. जिल्ह्यातील सर्व कृषी सेवा केंद्राची नियमित तपासणी म्हणजे त्यांची खरेदी बिले, स्टॉक रजिस्टर व इतर सर्व रेकॉर्ड पहाणे हे माझे काम होते. त्याच बरोबर बीयाणे, खते, किटकनाशक यांचे नमूने तपासणीसाठी घेणे, प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविणे, नमूने अप्रमाणित घोषित झाल्यास पूढील कारवाई करणे हे देखील माझे काम होते.

**०२.** माझ्या नियूक्तीबाबत शासन आदेशाची प्रत मी सोबत जोडलेली आहे, त्यामध्ये अ.क्र. १७ कडे माझे नाव आहे. शासन आदेशास **निशाणी क्र. ५९** देण्यात येत आहे. जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक हे पद महाराष्ट्र शासनाचे राजपत्रान्वये खत निरिक्षक म्हणून घोषीत करण्यात आले आहे. त्याबाबतचे महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक १३.१०.२०१० ची प्रत मी सोबत जोडली आहे, त्यामध्ये अ.क्र. ३८ वर तशी नोंद आहे. सबब, सदर राजपत्रास **निशाणी क्र. ६०** देण्यात येत आहे.

**०३.** दिनांक ०८.०२.२०१३ रोजी काजवा शेतकरी सेवा केंद्र, पणदूर तिठा, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग येथे नियमित तपासणीकरीता भेट दिली असता तेथे सिंगल सुपर फॉस्फेट (१६ टक्के), १४.५ WSP या ग्रेडचा खताचा सुमारे दोन टन एवढा साठा आढळून आला. या खताचा बॅच क्र. १५/१२/१२ असा होता. सदर खताची गुणवत्ता तपासून घेणे आवश्यक वाटल्याने त्याचा नमूना कृषी सेवा केंद्रातून तीन प्रतीत घेतला. त्यापैकी एक नमूना खत चाचणी प्रयोगशाळेत पाठविण्यासाठी, एक खत नमूना विक्रेत्याकडे ठेवण्यासाठी आणि एक नमूना

माझ्याकडे ठेवण्यासाठी अशा प्रकारे विभागणी केली.

**०४.** खताला खत नियंत्रण आदेशात सुचविल्याप्रमाणे सॅम्पल कोड नंबर ०५०१२३०७१२०१२२०१३एफ अशा प्रकारे तीनही नमून्यांच्या सिलबंद पिशव्यांवर नोंदविण्यात आला. त्यापैकी एक नमूना मी विक्रेत्याच्या ताब्यात दिला व त्याची पोहच घेतली. त्याच दिवशी सायंकाळी प्रयोगशाळेसाठीचा एक नमूना खत चाचणी प्रयोगशाळा, पूणे या शासकीय प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवला. दिनांक ०४.०३.२०१३ रोजीच्या अहवालाने प्रयोगशाळेने कळविले की, सदरचा खत नमूना तपासणीमध्ये अप्रमाणित घोषित झाला असून खत नियंत्रण आदेशात नमूद केलेल्या शम्य तरतूदींपेक्षा या खतामध्ये आवश्यक घटकांचे प्रमाण कमी आढळून आले आहे. सदर अहवाल दिनांक २५.०३.२०१३ रोजी प्राप्त झाला.

**०५.** त्यानंतर पूढील कायदेशीर कारवाई म्हणून दिनांक २६.०३.२०१३ रोजी सदरचे खत तयार करणारी कंपनी रामा कृषी रसायन, लोणी काळभोर, पूणे व खताचे विक्रेते काजवा शेतकरी सेवा केंद्र यांना कारणे दाखवा नोटीस बजावली. उत्तरा दाखल खत कंपनीने पाठविलेल्या दिनांक ०४.०४.२०१३ रोजीच्या पत्रात सदरचा तपासणी अहवाल त्यांना अमान्य असून खत नियंत्रण आदेशातील तरतूदीनूसार त्यांनी सदर खत नमून्याच्या पूर्नतपासणीची मागणी अपीलीय प्राधिकारी तथा विभागीय कृषी सह संचालक, कोकण विभाग, ठाणे यांचेकडे करीत असल्याचे कळविले.

**०६.** दिनांक ०४.०५.२०१३ रोजी अपीलीय प्राधिकारी यांनी खत कंपनी, खत निरीक्षक आणि विक्रेते यांना त्यांचेकडील शिल्लक खत नमूने पूर्नतपासाणीसाठी त्यांचे समोर हजर करणेबाबत आदेश पारित केले. त्यानूसार कंपनीने विक्रेत्याकडील खत नमूना व माझ्या कडील एक खत नमूना असे दोनही नमूने अपीलीय प्राधिकाऱ्यांसमक्ष सादर केले. त्यानंतर दिनांक २४.०९.२०१३ रोजी अपीलीय प्राधिकारी यांनी सदरची खत कंपनी व सदर कार्यालयास कळविले की, त्यांनी एक खत नमूना खत चाचणी प्रयोगशाळा, हमीरपूर, हिमाचलप्रदेश यांचेकडे पूर्नतपासणीसाठी पाठविला होता व त्या प्रयोगशाळेने सदर खत नमूना

परत एकदा अप्रमाणित घोषित केला आहे. या पूर्नतपासणीमध्ये देखील खतामधील घटकांचे प्रमाण खत नियंत्रण आदेशातील शम्य तरतूदींपेक्षा कमी होते. अशा प्रकारे सिंगल सूपर फॉस्फेट या खताचा नमूना दोनही तपासणीमध्ये अप्रमाणित घोषित आढळून आला आहे.

**०७.** दिनांक १२.१०.२०१३ रोजी खत कंपनीने खत नियंत्रण आदेशातील तरतूदीप्रमाणे खताच्या गुणवत्तेविषयी जबाबदार कंपनी प्रतिनिधी म्हणून निशिकांत लक्ष्मण भंडारी यांचे नाव कळविले. त्यानूसार इतर सर्व कागदपत्रे, राजपत्रे एकत्रित करुन अप्रमाणित खत नमून्याचा खटला दाखल करण्यासाठी नियंत्रक प्राधिकारी तथा जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, सिंधुदुर्ग यांचेकडे परवानगी मिळणेसाठी दाखल केले. त्यानूसार दिनांक ०३.०४.२०१४ रोजी नियंत्रक प्राधिकारी यांनी संबंधित सर्व आरोपीं विरुध्द म्हणजेच खत कंपनी, खताचे वितरक व प्रत्यक्ष खत विक्रेते यांचे विरुध्द खटला दाखल करणेसाठी परवानगी दिली. त्यानूसार तालूका न्यायदंडाधिकारी, कुडाळ यांचे न्यायक्षेत्रात खताचे वितरक व विक्रेते असल्याने त्यांच्या न्यायालयात सर्व तीनही आरोपीं विरुध्द खटला दाखल केला.

निशाणी क्र. ६१ कडील अर्जावरील आदेशान्वये सरतपास पूढील तारखेपर्यंत तहकूब.

श्रवणोत्तर स्वीकृत,
सही/–
(श्रीम. व्ही. आर. जांभुळे.)
मुख्य न्यायदंडाधिकारी,
सिंधुदुर्ग – ओरोस.

दिनांकः २४.०९.२०२४.